# कार्यकारी सारांश

## 1 अवलोकन

मे. माइंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रायव्हेट लिमिटेड (यापुढे ज्यांना "एमबीपीपीएल" किंवा "फिर्यादी" असे संबोधले जाईल) [पूर्वी सिरिन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखली जात असे], कंपनी अधिनियम, 1956, च्या धारांनुसार गठित कंपनी आहे, जिचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. सी-30, ब्लॉक 'जी', एसआयडीबीआय समोर, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पू), मुंबई – 400051, महाराष्ट्र, भारत येथे आहे.

एमबीपीपीएल, विशेष वित्तीय झोन्स (एसईझेड) अधिनियम, 2005 (2005 पैकी 28)च्या धारा 3 च्या अधीन, माहिती तंत्रज्ञान तथा माहिती तंत्रज्ञान सक्रिय सेवा (आयटी & आयटीईएस) साठी प्लाट क्र. 3, कळवा, टीटीसी औद्योगिक क्षेत्र, एमआयडीसी, तालुका ठाणे, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र राज्य येथे एक सेक्टर निर्दिष्ट विशेष वित्तीय क्षेत्र (एसईझेड) स्थापित करत आहे.

वरील गोष्टींस अनुसरून, एमबीपीपीएल त्याच्या एसईझेड क्षेत्रात प्लाट क्र. 3, कळवा, टीटीसी औद्योगिक क्षेत्र, एमआयडीसी, तालुका ठाणे, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र राज्य येथील एक मान्यताप्राप्त वितरण परवानाधारक आहे. माननीय आयोगाने 2011 च्या खटला क्र.157 मध्ये त्यांच्या 11 एप्रिल, 2012 च्या आदेशाअन्वये, एमबीपीपीएल च्या मानलेल्या वितरण परवानाधारक स्थितीस नोंदीवर घेतले आहे आणि त्यानंतर 21 ऑगस्ट, 2013 रोजी एमबीपीपीएलसाठीच्या परवान्याच्या निर्दिष्ट शर्ती अधिसूचित केल्या.

पुढे, वितरण परवान्याच्या निर्दिष्ट शर्ती माननीय आयोगाद्वारे सिरिन प्रॉपर्टेज प्रायव्हेट लिमिटेडच्या नावे निर्गमित केल्या गेल्या, परंतु 23 नोव्हेंबर, 2015 पासून, सिरिन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेडचे नाव बदलून माइंडस्पेस बिझनेस पार्क्स प्रायव्हेट लिमिटेड असे करण्यात आहे. एमबीपीपीएलने 18 डिसेंबर, 2015 रोजी नावाच्या बदलासाठी 21 ऑगस्ट, 2013 रोजी निर्गमित एमईआरसी [ऐरोली, ठाणे येथील एसईझेडसाठीच्या मे. सिरिन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) साठी लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विनिर्दिष्ट शर्ती] नियम, 2013 च्या सुधारणेसाठी एक याचिका सादर केली. एमबीपीपीएलने एमइआरसी (वितरण परवान्याच्या सर्वसामान्य अटी) नियमावली, 2006 अनुसार वर्तमानपत्रात त्याच्या वितरण परवान्याचे प्रस्तावित नावबदलाची विवरणासह नोटीसही प्रकाशित केली आहे.

### 1.1 एमईआरसी एमवायटी नियम, 2015 अंतर्गत फाइल करणे

जेव्हा की, एमबीपीपीएलच्या संक्रिया एक वितरण परवानाधारकाच्या रूपात 9 एप्रिल, 2015पासून सुरू झाल्या, म्हणजेच आर्थिक वर्ष 2015-16, एमबीपीपीएल आर्थिक वर्ष 2015-16 साठी प्रोव्हीजन ट्रुईंग अपसाठी याचिका सादर करत आहे, एमईआरसी एमवायटी नियम, 2011 च्या अनुसार, जसे की एमईआरसी एमवायटी नियम, 2015

च्या नियम 5.1 (ए) (ii) मध्ये निर्दिष्ट केले आहे. पुढे, एमबीपीपीएल तृतीय नियंत्रण काळ आर्थिक वर्ष 2016-17 पासून ते आर्थिक वर्ष 2019-20 पर्यंतसाठी बहु बर्षी वीज दर याचिका सादर करत आहे, एमईआरसी एमवायटी नियम, 2015 च्या नियम 5.1 (ए) (ii) मध्ये निर्दिष्ट केलेले आहे त्यानुसार.

# 2 याचिका सादर करण्याचे प्रस्तावीकरण

## 2.1 वीज खरेदी

माननीय आयोगाने, त्यांच्या 30 डिसेंबर, 2014 तारखेच्या आदेशा अन्वये, लहान कालावधीच्या वीज खरेदीसाठी एमबीपीपीएल आणि ग्लोबल एनर्जी दरम्यानच्या पीपीएला अनुमोदित केले आणि प्रतिस्पर्धात्मक बोलीच्या माध्यमाने निर्धारण केलेल्या वीज दराला अनुमोदन दिले. पुढे, एमबीपीपीएलने 2015 च्या खटला क्र. 49 मध्ये एप्रिल 2016 पासून मध्यम कालीन 5 वर्षीय कालखंडासाठी अधिकार देण्याच्या प्रबंधासाठी प्रतियोगात्मक बोलीद्वारे योजनेच्या अनुमोदनासाठी माननीय आयोगाच्या समक्ष याचिका सादर केली, जी आदेशासाठी प्रलंबित आहे. एमबीपीपीएल अधिकार प्रबंध प्रक्रियेस मार्च, 2016 अंतापर्यंत पूर्ण करण्याबाबत अपेक्षा करत आहेत आणि या पीपीएच्या अधीन अधिकार प्रवाहन पुढील नियंत्रण कालावधीमध्ये एप्रिल 2016 पासून सुरू होण्याचे अपेक्षित आहे.

## 2.2 आर्थिक वर्ष 2015-16 मध्ये आकारलेले वीज दर

वितरण परवानाधारक म्हणून एमबीपीपीएलच्या संक्रिया 9 एप्रिल, 2015 पासून सुरू झाल्या, म्हणजेच, आर्थिक वर्ष 2015-16. एप्रिल तसेच मे 2015 महिन्यांसाठी, एमबीपीपीएलने तेच वीज दर उपभोक्त्यांस आकारले, जे की एमएसइडीसीएलच्या पुरवठा क्षेत्रातील अनुक्रमे श्रेणीतील उपभोक्यांसाठी लागू होते. आयोगाद्वारे एमएसइडीसीएलच्या पुरवठा क्षेत्रातील अनुक्रमे श्रेणीतील उपभोक्यांच्या वीज दराला त्यांच्या 26 जून, 2015 अन्वये जून 2015 पासून सुधारित केले गेले. एप्रिल तसेच मे 2015 मध्ये लादल्या गेलेल्या वीज दराहून संबंधित श्रेणींसाठी अनुमोदित टॅरिफ्स उच्च होते, प्राथमिकपणे फ्युल कॉस्ट एडजस्टमेंट (एफसीए) सोबत उर्जा शुल्काच्या मर्जरमुळे. एमएसइडीसीएल चे हे सुधारित वीज दर एमबीपीपीएलचे सिलिंग वीज दर असल्याकारणाने, तसेच एमबीपीपीएलसाठी कमी वीज दराने चालवू शकत असल्याने सुधारित टॅरिफ्लनी वसुली करणे जरूरी नव्हते, यामुळे एमबीपीपीएलने उपभोक्त्यांसाठी जून 2015 पासून त्याच्या क्षेत्रातील टॅरिफ्स सुधारणा केली नाही, केवळ एलटी V-B श्रेणीसाठी रू. 7.01 प्रति युनिट ते रू. 6.98 युनिट उर्जा शुल्क घटवण्याचा अपवाद सोडून, तसेच नाइट ऑफ-पीक अवर्स साठी टीओडी सूट कमी केली रू. 2.50 प्रति युनिट ते रू. 1.50 प्रति युनिट.

## 2.3 आर्थिक वर्ष 2015-16 साठी नियंत्रण कालावधी आणि संमिश्र प्रोव्हीजन ट्रु-अपसाठी वायर व्यवसाय आणि किरकोळ वीजपुरवठा व्यवसाय यांचे विलगीकरण

एमबीपीपीएल आदरपूर्वक असे म्हणते की एमएसइडीसीएलचे श्रेणी-अनुसार वीज दर, जे एमबीपीपीलच्या पुरवठा क्षेत्रासाठी सिलिंग वीज दर म्हणून लागू केले गेले, वायर व्यवसाय आणि किरकोळ वीजपुरवठा व्यवसाय यांसाठी एक

संमिश्र वीज दर आहे, आणि उर्जा शुल्कात सन्निहित वीज वहन शुल्क वेगळे दर्शवलेले नाही. या परिस्थितींच्या अंतर्गत, आर्थिक वर्ष 2015-16 साठी वायर व्यवसाय आणि किरकोळ वीजपुरवठा व्यवसाय यांकरिता वेगळे तात्कालिक ट्रुईंग-अप अंगिकारणे रास्त होत नाही.

यामुळे, आर्थिक वर्ष 2015-16 साठीच्या तात्कालिक ट्रुईंग अपच्या हेतुसाठी, एमबीपीपीएलने संमिश्र एआरआर जमा केले आणि वायर आणि किरकोळ वीजपुरवठा अशा एकत्रित व्यवसायासाठी महसूल पोकळी (revenue gap)/(अतिरिक्त) निर्धारित केली. तथापि, वायर व्यवसाय आणि किरकोळ वीजपुरवठा व्यवसाय यांसाठी वेगळा वेगळा एआरआर माननीय आयोगाद्वारे विहित प्रपत्रांत दर्शवलेला आहे, आणि तृतीय नियंत्रण कालावधीसाठी वायर व्यवसाय आणि किरकोळ वीजपुरवठा व्यवसाय यांच्या एआरआरचे प्रोजेक्शनसाठी पाया मानला गेला. खर्चांच्या वाटपांसाठी, एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 मधील नियम 68 मध्ये निर्दिष्ट वाटप साचा विचारात घेतलेला आहे, जेथेही खर्च आणि महसूल यांचा वास्तविक ब्रेक-अप उपलब्ध नाही. तथापि, एआरआर अंश जसे की अवमूल्यीकरण, दीर्घ-कालीन कर्जावरील व्याज, आणि इक्विटीवरील रिटर्न, यांना वायर व्यवसाय आणि किरकोळ वीजपुरवठा व्यवसाय यांच्या अधीन वायर व्यवसाय आणि किरकोळ वीजपुरवठा व्यवसाय यांमधील फीक्स्ड ॲसेटच्या वास्तविक ब्रेक अपवर आधारित, जो की जवळपास 98:2 च्या प्रमाणात आहे, स्वतंत्रपणे विचारात घेतलेले आहे.

## 2.4 एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावीकरण

आर्थिक वर्ष 2016-17 ते आर्थिक वर्ष 2019-20 साठीच्या नियंत्रण कालावधीसाठी एआरआर तसेच विजेची वीज वहन आणि विजेचा रिटेल पुरवठा यांचे अंदाज एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 च्या अनुसार केलेले आहेत.

पुढे, आर्थिक वर्ष 2016-17 पासून, एमबीपीपीएल असे प्रस्तावित करते की एमएसइडीसीएल च्या सिलिंग वीज दराशी संलग्न रहाण्यापेक्षा, श्रेणी-नुसार टॅरिफ्स एमबीपीपीएलच्या एआरआरच्या आधारावर निर्धारित केली जावीत, जे की केवळ स्विकारलेली एक अंतरिम गोष्ट होती जोवर एआरआर आणि टॅरिफ्स यांना एमबीपीपीएलसाठी स्वतंत्रपणे पक्के केले जात नाही.

## 2.5 सार्वजनिक नोटीस

वर्तमानपत्रांत सार्वजनिक नोटीस देऊन पुरवठा क्षेत्रात विस्तृत प्रसारण करण्याचे उद्दिष्ट होते की प्रस्तावित एआरआर आणि वीज दर प्रकाशित व्हावे आणि उपभोक्ता वीज दरामधील प्रस्तावित बदलांबाबत ज्ञात व्हावेत. एमबीपीपीएल आदरपूर्वक असे म्हणते की ते हे उद्दिष्ट्य 100% साध्य करतील, म्हणजेच, ते त्यांच्या प्रस्तावाबाबत दर आणि प्रत्येक उपभोक्त्यास कळवू शकते, हार्ड कॉपी तसेच इमेल च्या माध्यमाने, त्याच रीतीने जशी त्यांना दर महिन्यास बिले पाठवली जातात. म्हणूनच, एमबीपीपीएल आदरपूर्णपणे म्हणतो की त्यांच्या मामल्यात, कमीत कमी दोन इंग्रजी आणि दोन मराठी भाषिक दैनिक वृत्तपत्रांत प्रकाशित करण्याची खरोखरच गरज नाही, कारण की यामुळे उगाचच

खर्च उद्धवतो, आणि प्रस्तावित वीज दर सुधारणेबाबत लोकांत जागरूकता पसरवण्याचे उद्दिष्ट्य हे प्रत्येक उपभोक्त्यास थेट कळवून साध्य होऊ शकते.

वरील गोष्टींच्या अनुषंगाने, एमबीपीपीएल आदरपूर्वक माननीय आयोगाला सार्वजनिक नोटीस, ज्या क्षेत्रात याचिका संबंधित आहे आणि जेथे विस्तृतरीत्या वितरीत होणाऱ्या कमीत कमी दोन इंग्रजी आणि दोन मराठी भाषिक दैनिकांमध्ये प्रसिध्द करण्याच्या गरजेस सूट देण्याची विनंती करते.

## 3 आर्थिक वर्ष 2015-16 साठी तात्कालिक ट्रुईंग-अप

एमबीपीपीएलच्या वितरण परवानाधारकाच्या रूपाने संक्रिया 9 एप्रिल, 2015 पासून सुरू झाल्याने, जे की आर्थिक वर्ष 2015-16 मध्ये येते, एमबीपीपीएल आर्थिक वर्ष 2015-16 साठी एमइआरसी एमवायटी नियमावली, 2011, च्या अनुसार तात्कालिक ट्रुईंग-अप याचिका फाइल करत आहे, जे एमईआरसी एमवायटी नियम, 2015 च्या नियम 5.1 (ए) (ii) मध्ये निर्दिष्ट केले आहे.

### 3.1 उर्जा विक्री

तात्कालिक ट्रुईंग-अपच्या हेतुसाठी, एमबीपीपीएलने एप्रिल 2015 ते डिसेंबर 2015 दरम्यानच्या वास्तविक विक्रींना विचारात घेतले आहे. आर्थिक वर्ष 2015-16चे उर्वरित तीन महिने, म्हणजेच जानेवारी ते मार्च 2016 च्या उर्जा विक्रीस प्रत्यालेखित करण्यासाठी, एमबीपीपीएल ने प्रत्येक श्रेणीसाठी मे 2015 ते डिसेंबर 2015 च्या सरासरी विक्रीसमानास विचारात घेतले आहे.

### 3.2 वितरण तोटा

एमबीपीपीएलने एप्रिल 2015 ते डिसेंबर 2015 या कालावधीतील वास्तविक उर्जा विक्री आणि उर्जा प्राप्त यांच्या आधारावर त्या कालावधीसाठीचा वास्तविक तोटा विचारात घेतला. आधी चर्चा केल्यानुसार, वास्तविक वितरण तोटा यात नियामक परिवर्तन तोट्यांच्या आधारावर बिल केलेले युनिट्स समाविष्ट असतात. एमबीपीपीएल ने जानेवारी 2016 ते मार्च 2016 कालावधीसाठी परिवर्तन तोटे सोडून उर्जा विक्रीचा प्रस्ताव दिला आहे, त्यानुसार, या कालावधीसाठीचा वितरण तोटा वास्तविक वितरण तोट्याच्या आधारावर, परिवर्तन तोट्यांस वगळून प्रत्यालेखित केलेला आहे.

### 3.3 उर्जा शेष

एमबीपीपीएलने एप्रिल 2015 ते डिसेंबर 2015 कालावधीतील वास्तविक विक्री आणि वीज खरेदी यांना विचारात घेतले आणि उर्जा विक्रीचे अनुमान लावले, जसे की वर चर्चा केलेली आहे. एमबीपीपीएलने महाराष्ट्र राज्य लोड पारेषण केंद्र (एमएसएलडीसी) द्वारे बनवल्या गेलेल्या स्टेट ग्रिड तोटा खात्यांच्या आधारावर एप्रिल 2015 ते

नोव्हेंबर 2015 कालावधीसाठीच्या 3.97 % च्या वास्तविक आंतर-राज्य पारेषण तोट्यास विचारात घेतले, आणि त्याच 3.97 % च्या आंतर-राज्य पारेषण तोट्याच्या आधारावर उर्जा गरजेचे प्रत्यालेखन केले.

## 3.4 वीज खरेदी मुल्य

आर्थिक वर्ष 2015-16 साठीच्या वीज खरेदी मुल्याचा गोषवारा खालील प्रकारे आहे:

तक्ता 3-1: आर्थिक वर्ष2015-16 साठी वीज खरेदी मुल्य

| स्त्रोत | वीज खरेदी परिमाण (एमयु) | एकूण मुल्य (रू. कोटींत) | सरासरी वीज खरेदी मुल्य (रू./युनिट) |
|---|---|---|---|
| ग्लोबल एनर्जी, बाहेरील राज्याकडून | 19.65* | 7.56 | 3.85 |
| ग्लोबल एनर्जी, आंतर-राज्याकडून | 66.01 | 25.60 | 3.88 |
| असमतोल पूल | 1.16 | 0.43 | 3.88 |
| विकत घेतलेल्या आरईसी | | 1.18 | |
| शेष आरईसी खरेदी | | 0.09 | |
| एकूण | **85.65** | **34.86** | **4.07** |

* 0.45 एमयुचा आंतर-राज्यीय पारेषण तोटा समाविष्ट आहे.

## 3.5 संचालन आणि देखभाल खर्च

एमबीपीपीएलला एमइआरसी एमवायटी नियमावली, 2011 च्या प्रभावात येण्याच्या तारखेच्या पश्चात वितरण परवान्याच्या विनिर्दिष्ट शर्ती निर्गमित केल्या गेल्या होत्या. पुढे, एमबीपीपीएल एआरआर आणि वीज दरासाठी त्याची पहिलीच याचिका सादर करत आहे, आणि एमइआरसी एमवायटी नियमावली, 2011मध्ये एमबीपीपीएमच्या संचालन व देखभाल खर्चांचे निर्धारण करण्यासाठी असे कुठलेही मानक वा कार्यप्रणाली नमूद नाही. माननीय आयोगाला मामला-विनिर्दिष्टतेने एमबीपीपीएलसाठी संचालन व देखभाल खर्च निर्धारण करायला हवेत.

**कर्मचारी खर्च**

केआरसीएसपीएलसोबतच्या करारातील अटींनुसर, एमबीपीपीएल उर्जा विक्रीच्या प्रति युनिट 35 पैसे कर्मचारी खर्च स्वरूपात केआरसीएसपीएलला अदा करेल, प्रति वर्षीच्या12% च्या वाढीव दराने.

**प्रशासन विषयक व सर्वसाधारण खर्च**

एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष 2015-16च्या एच1 साठीच्या वास्तविक प्रशासन विषयक व सर्वसाधारणखर्चांस विचारात घेऊनआर्थिक वर्ष 2015-16च्या एच2 साठी खर्चांचा अंदाज लावला.

**दुरूस्ती व देखभाल खर्च**

दुरूस्ती व देखभाल खर्चांस ध्यानात ठेवत, एमबीपीपीएल वत्स इलेक्ट्रीक कंपनीसोबत वितरण प्रणालीच्या दुरूस्ती आणि देखभाल च्या करारात सामील झाले. एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष 2015-16च्या एच1 साठीच्या वास्तविक दुरूस्ती व देखभाल खर्चांस विचारात घेऊनआर्थिक वर्ष 2015-16च्या एच2 साठी खर्चांचा अंदाज लावला.

एमबीपीपीएल पुढे असे सादर करते की आर्थिक वर्ष 2015-16 चा प्रति युनिट संचालन व देखभाल खर्च रू. 0.59/युनिट येतो, जो की महाराष्ट्रातील अन्य वितरण लायसेंसिसच्या सध्याच्या संचालन व देखभाल खर्चांपेक्षा खूप कमी आहे, पुरवठा क्षेत्र मर्यादित असण्याने कमी विक्री होण्याच्या सत्यतेस विचारात घेत, एमबीपीपीएलचे संचालन व देखभाल खर्च प्रति युनिटच्या आधारावर उच्च असणे अपेक्षित होते. म्हणूनच, एमबीपीपीएल माननीय आयोगाला आर्थिक वर्ष 2015-16 साठी रू. 4.93 कोटी संचालन व देखभाल च्या अंदाजे खर्चास अनुमोदन देण्याची नम्रपणे विनंती करत आहे.

## 3.6 भांडवल खर्च आणि भांडवलीकरण

एमबीपीपीएल असे सादर करते की त्याने त्याच्या वितरण क्षेत्रात त्याच्या उपभोक्त्यांस वीज पुरवठा करण्यासाठी वितरण प्रणाली स्थापित केले आहे. एमइआरसी [मे. सिरिन प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड (एसपीपीएल) ला त्याच्या ऐरोली, ठाणे येथील आयटी/आयटीइएस एसईझेडसाठी लागू वितरण परवान्याच्या विनिर्दिष्ट शर्ती] नियमावली 2013 चा नियम 7 असे निर्दिष्ट करतो की:

> *"7. अखंड वीज पुरवठा. –मानलेली वितरण परवानाधारकाने वितरण क्षेत्रभरात चोवीस तास अखंड वीज पुरवठा होण्यासाठी तरतूदी करावयास हव्या."*

पुढे, माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित इंफ्रास्ट्रक्चर गरजांबाबतचा एसईझेड नियम, 2016 चे कलम 5अ असे ठरवतो की माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित विशेष आर्थिक क्षेत्राच्या मामल्यात खालील सुविधांची खातरजमा व्हावी, त्या आहेत:

(अ) क्षेत्रात स्थिर फ्रीक्वेंसीवर चोवीस तास अखंडित वीज पुरवठा;

(ब) अखंड आणि सुरक्षित डेटा प्रेषणासाठी विश्वासार्ह कनेक्टीव्हीटी;

(क) केंद्रीकृत वातानुकून संरचनेसाठी तरतूद; आणि

(ड) शेवटच्या उपभोक्त्यांसाठी वापरास तयार, फर्निश्ड 'प्लग आणि प्ले' सुविधा

एसईझेड विकासकासाठी प्रमुख ध्येय म्हणजे सेवा सुधारणे आणि त्याच्या समस्त एसईझेड अशीलांस गुणवत्तापूर्ण, विश्वासार्ह, आणि तुलनात्मक मुल्यांवर वीज पुरवठा करणे. आयटी आणि आयटीईएस सारख्या सेवा इंडस्ट्रीतील ग्राहकांस विश्वासार्ह वीज पुरवठा हवा असतो. आयटी आणि आयटीईएस विनिर्दिष्ट एसईझेड असल्याकारणाने तसेच वाणिज्य मंत्रालय, भारत सरकारच्या विनिर्दिष्ट हुकूमाने, समस्त ग्राहकांस अखंड वीज पुरवठा तसेच अन्य वीजेचे इंफ्रास्ट्रक्चर पुरवण्याची विकासकाची जबाबदारी आहे. यानुसार, एमबीपीपीएलने त्याच्या वीज इंफ्रास्ट्रक्चरचे असे योजन केले आहे की ते त्यांच्या उपभोक्त्यांस वीजेचा गुणवत्तापूर्ण आणि विश्वासार्ह पुरवठा पुरवू शकतील, जेणेकरून एसईझेड नियम बरहूकूम आणि परवाना शर्तीं पूर्ण करू शकतील.

वरील गोष्टींस लक्षात घेत, एमबीपीपीएलने स्टेट ऑफ द आर्ट वितरण प्रणाली रचण्यासाठी त्याच्या पुरवठा क्षेत्रात 88.70 कोटीचे भांडवल गुंतवले आहे. 88.70 कोटीची एकंदर राशी आर्थिक वर्ष 2014-15 मध्येच वितरण

परवानाधारकाच्या संक्रिया सुरू होण्याआधीच गुंतवली गेली होती. वितरण परवानाधारक संक्रिया 9 एप्रिल, 2015 पासून सुरू झाल्यावर, एमबीपीपीएलने वितरण परवानाधारकाच्या एकूण संपत्तीस आर्थिक वर्ष 2015-16 साठीची प्रारंभिक जमा स्वरूपात विचारात घेतले आणि 9 एप्रिल, 2015ते 31 मार्च, 2016 पर्यंतच्या अवमूल्यीकरण, दीर्घ कालीन कर्जावरील व्याज आणि प्रमाणातील इक्विटीवरील रिटर्न यावर त्याच्याच प्रभावास विचारात घेतले.

एमबीबीपीलद्वारे वरील भांडवल व्ययावरील विवरणपूर्ण प्रकल्प अहवाल आधीच माननीय आयोगाला 31 डिसेंबर, 2015 ला दिले गेलेल्या 29 डिसेबंर, 2015 तारखेच्या पत्रान्वये जमा केलेला आहे.

एमबीपीपीएल ने आर्थिक वर्ष 2015-16 साठी डीपीआर योजनांव्यतिरिक्तसाठी 8.25 कोटीच्या भांडवलीकरणाचा अंदाज लावला आहे. अन्य युटीलिटीजसाठीच्या वीज दर आदेशात, माननीय आयोगाने त्या वर्षीसाठीच्या अनुमोदित डीपीआर योजनांच्या 20% डीपीआर योजनांव्यतिरिक्तसाठी भांडवल खर्च आणि भांडवलीकरणासाठी डीपीआर भांडवली खर्चाव्यतिरिक्तची उच्च मर्यादा घातली आहे. तथापि, एमबीपीपीएलने केवळ डीपीआर योजनांव्यतिरिक्तसाठीच भांडवल खर्चाचा प्रस्ताव दिला आहे. या संदर्भात, एमबीपीपीएल आदरपूर्वक म्हणते की ते एक अनन्य वितरण परवानाधारक आहेत जे एका लहानशा आयटी & आयटीइएस विनिर्दिष्ट उपभोक्ता क्षेत्रास पुरवठा करतात. एमबीपीपीएलच्या मामल्यात, त्याच्या पुरवठा क्षेत्रातील वितरण प्रणालीचा मोठा भाग आधीच मांडलेला आहे, तसेच संबंधित भांडवल खर्चाच्या अनुमोदनासाठीचे आवेदन आधीच माननीय आयोगाला डीपीआरसह जमा केलेल आहे. म्हणूनच, एमबीपीपीएलच्या मामल्यात, डीपीआर योजनांसाठीचे भांडवली खर्च दर वर्षी आवश्यक असणार नाहीत,आणि म्हणूनच, हा मानदंड एमबीपीपीएलसाठी शिथिल केला जावा, अन्यथा, एमबीपीपीएल नियंत्रण कालावधीत कसलाच भांडवली खर्च अंगिकारू शकणार नाही.

## 3.7 कर्ज:इक्विटी प्रमाण

एमबीपीपीएलने एमइआरसी एमवायटी नियमावली, 2011 च्या नियम 30 अनुसार भांडवलीकरणास विचारात घेतले आहे, ज्यान्वये उपभोक्त्याच्या अभिदानाच्या वजावटीच्या पश्चात निर्देशात्मक 70:30 च्या डेब्ट:इक्विटी प्रमाण परवानगीप्राप्त असेल.

## 3.8 अवमूल्यीकरण

एमबीपीपीएलने एमइआरसी एमवायटी नियमावली, 2011 च्या नियम 31 अनुसार, वर्षासाठीच्या सरासरी जीएफएवर, त्या वर्षीच्या भांडवलीकरणास लक्षात घेत, आर्थिक वर्ष 2015-16 साठी अवमूल्यीकरणाचे मोजमाप केले आहे. एमबीपीपीएलच्या वितरण परवानाधारकाच्या रूपाने संक्रिया 9 एप्रिल, 2015 पासून सुरू झाल्याने, अवमूल्यीकरणास 9 एप्रिल 2015 पासून विचारात घेतले गेले. पुढे, उपभोक्ता अभिदानीत संपत्तीवर अवमूल्यीकरण विचारात घेतले गेलेले नाही.

## 3.9 दीर्घ कालीन भांडवल कर्जावर व्याज

एमबीपीपीएल असे म्हणते की त्याची वितरण प्रणाली स्थापन करण्यासाठी रू. 88.70 कोटीची प्रारंभिक भांडवल गुंतवणूक संपूर्णपणे इक्विटी भांडवलाच्या माध्यमाने वित्तसहाय्य प्राप्त आहे. तथापि, एमइआरसी एमवायटी नियमावली, 2011 च्या नियम 30 अनुसार केवळ भांडवल दराच्या 30% पर्यंत इक्विटी डेप्लॉयमेंटला अनुमति देते आणि उर्वरित 70% ला साधारण कर्ज म्हणून हाताळावे लागते. वरील नियमाच्या आधारावर, मानदंडक कर्ज हे दीर्घ कालीन कर्ज भांडवल यावरील व्याजाच्या गणतीसाठी विचारात घेतले जाते.

पुढे, हे 62.10 कोटीचे मानदंडक कर्जास मे 2015 मध्ये आयडीएफसी बँकेकडून आजच्या तारखेच्या जलावतलन 11.15% व्याज दराने वास्ततिक कर्ज घेऊन पुन: अर्थ सहाय्यप्राप्त झाले. त्यानुसार, एमबीपीपीएलने व्याज दर पुन:अर्थसहाय्य प्राप्त कर्जाच्य आधारावर प्रस्तावित केले आहे आणि एमईआरसी एमवायटी नियमावली, 2011 च्या नियम 33 नुसार आर्थिक वर्ष 2015-16 साठी दीर्घ-कालीन भांडवल कर्जावरील व्याजाची गणना केली.

## 3.10 कार्यशील भांडवलावरील व्याज

एमबीपीपीएलने एमईआरसी एमवायटी नियमावली, 2011 च्या नियम 35 नुसार, मिश्रितपणे वितरण वायर आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यासाठी कार्यशील भांडवलावरील व्याजाची गणना केली. त्याने वर्तमान याचिका सादर करण्यासाठी 14.05% चा स्टेट बँक अग्रिम दर विचारात घेतला आहे.

## 3.11 उपभोक्ता सुरक्षा ठेवींवरील व्याज

एमबीपीपीएलने वास्तविक सुरक्षा ठेवींवरील बँकेच्या 8% व्याजदरास विचारात घेतले आहे.

## 3.12 इक्विटीवरील परतावे

एमबीपीपीएलने संमिश्र व्यवसायासाठीच्या इक्विटीवरील परताव्यांची गणना केली आहे. एमईआरसी एमवायटी नियमावली, 2011 वितरण वायर आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांसाठी अनुक्रमे 15.5 % आणि 17.5% परतावा दर निर्दिष्ट करत असल्याने, एमबीपीपीएलने वितरण वायर आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांदरम्यानच्या 97.60:2.40च्या आधारावर मालमत्ता आबंटन 15%चा भारित सरासरी परतावा दर विचारात घेतला आहे.

## 3.13 आय कर

एमबीपीपीएलच्या मामल्यात, वर्तमान वर्ष हे संक्रियेचे पहिले वर्ष आहे आणि नियामक व्यवसायासाठी गत वर्षांसाठी एकही लेखा परीक्षण केलेले खाते उपलब्ध नाही. माननीय आयोगाद्वारे निपटान केलेले भांडवल विचारात घेत, आणि नियामक व्यवसायासाठी अनुपलब्ध लेखा परीक्षित खात्यांच्या स्थितीमध्ये, एमबीपीपीएल ने त्याच्या नियामक व्यवसायासाठी आर्थिक वर्ष 2015-16 साठी पीबीटीच्या आधारावर त्याच्या आयकराची गणना केली आहे. एसईझेड अधिनियम, 2005 च्या अनुसार, एमबीपीपीएलला पहिल्या पाच वर्षांसाठी कॉर्पोरेट कर भरण्याची आवश्यकता नाही, परंतु त्यास आर्थिक वर्ष 2015-16 साठी एमएटी भरणे आवश्यक आहे.

## 3.14 बुडवलेल्याकर्जासाठी तरतूद

एमबीपीपीएलने अशोध्य कर्जासाठी कसलीच तरतूद केलेली नाही कारण की त्याच्याकडे आर्थिक वर्ष 2015-16 च्या अंतास काहीच प्राप्त करण्याचे योजन नाही. जर का, आर्थिक वर्ष 2015-16 मधील लेखा परीक्षित खात्यांत काही ट्रेड प्राप्तीयुक्त असल्यास, एमबीपीपीएलने ते एमईआरसी एमवायटी नियमावली, 2011 नुसार आर्थिक वर्ष 2015-16 साठी ट्रुईंग अप करते वेळेस प्रस्तावित करावयास हवे.

## 3.15 आकस्मिकता राखीवमध्ये अभिदान

एमईआरसी एमवायटी नियमावली, 2011 चा नियम 36, प्रारंभिक जीएफएच्या 0.25% ते 0.5% च्या दरम्यान आकस्मिकता राखीवसाठी अभिदानासाठी तरतूद करतो. याच्या संदर्भात, एमबीपीपीएल असे म्हणते की ते फारच लहानशा पुरवठा क्षेत्रात काम करतात. जर का काही अप्रिय/आकस्मिक घटना घडते, तर त्याचा प्रभाव समस्त एसईझेड च्या क्षेत्रावर दिसून येऊ शकतो. म्हणूनच, एमबीपीपीएलणे फीक्स्ड मालमत्तेच्या मूळ मुल्याच्या 0.5% एवढी रक्कम आकस्मिकता राखीवासाठी अभिदान म्हणून विचारात घेतले आहे.

## 3.16 वीज दराव्यतिरिक्त मिळकत

एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष 2015-16 च्या एच1 साठी 0.01 कोटीची वास्तविक वीज दराव्यतिरिक्त मिळकत विचारात घेतली आहे आणि तीच रक्कम टेंडर्स विक्रीसाठी आर्थिक वर्ष 2015-16 च्या एच2 साठी अंदाजित केली आहे.

## 3.17 विजेच्या विक्रीपासून मिळणारा महसूल

एमबीपीपीएलने एप्रिल 2015 ते डिसेंबर 2015 दरम्यानच्या वीज विक्रीमुळच्या वास्तविक महसूलास विचारात घेतले आहे आणि वर्षात संपादित वास्तविक महसूलाच्या सामान्यीकरणाने वीज विक्रीपासून अपेक्षित महसूलाचा अंदाज वर्तवला.

## 3.18 समग्र महसूल गरज

आर्थिक वर्ष 2015-16 साठी एमाबीपीपीएलचे एकत्रित एआरआर खालीलप्रमाणे खुलासाकृत केलेला आहे.

| अनु. क्र. | विवरण | रक्कम (रू. कोटी) |
|---|---|---|
| 1. | वीज खरेदी मुल्य | 34.86 |
| 2. | संचालन व देखभाल खर्च | 4.93 |
| 3. | अवमूल्यीकरण | 4.78 |
| 4. | भांडवली कर्जावरील व्याज | 6.81 |
| 5. | कामकाजी भांडवलावरील व्याज | 0.43 |
| 6. | उपभोक्ता सुरक्षा ठेवीवरील व्याज | 0.30 |
| 7. | कर्ज बुडव्या आणि संशयित बुडवेपणासाठी तरतूद | 0.00 |

| अनु. क्र. | विवरण | रक्कम (रू. कोटी) |
|---|---|---|
| 8. | आकस्मिकता राखीवांसाठी अभिदान | 0.44 |
| 9. | आय कर | 1.10 |
| 10. | एकूण महसूल खर्च | **53.65** |
| 11. | इक्विटीवरील परतावा | 4.23 |
| 12. | एकंदर महसूल गरज | **57.87** |
| 13. | वजा: वीज दराव्यतिरिक्त मिळकत | 0.02 |
| 14. | एकूण समस्त महसूल गरज | **57.86** |

### 3.19 महसूल पोकळी (revenue gap)/(अतिरिक्त)

एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष 2015-16 साठी खालीलप्रमाणे महसूल पोकळीची (revenue gap)/(अतिरिक्त)गणना केली आहे:

तक्ता 3-3: आर्थिक वर्ष 2015-16 साठी महसूल पोकळी (revenue gap)/(अतिरिक्त)

| अनु. क्र. | विवरण | रक्कम (रू. कोटी) |
|---|---|---|
| 1. | एकंदर महसूल गरज | 57.86 |
| 2. | वीजेच्या विक्रीपासूनचा महसूल | 58.30 |
| 3. | महसूल पोकळी (revenue gap)/(अतिरिक्त) | (0.44) |

एमबीपीपीएल नम्रपणे माननीय आयोगाला आर्थिक वर्ष 2015-16 साठी रू. 0.44 कोटीच्या अतिरिक्त महसूलास अनुमोदित करण्याची आणि या याचिकेतील पुढे येणाऱ्या कलमांत चर्चा केल्यानुसार नियंत्रण कालावधीच्या एआरआरच्या माध्यमाने त्याचेच समायोजन करण्याची विनंती करते.

# 4 एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी एकंदर महसूलाची आवश्यकता

### 4.1 वितरण वायर आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसायचे आबंटन

या याचिकेस फाइल करण्याच्या हेतूसाठी, एमबीपीपीएलने एमईआरसी एमवायटी नियमावली, 2015 च्या नियम 68 नुसार वायर व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय दरम्यान खर्चांचे आबंटन विचारात घेतले आहे. तथापि, एआरआर गोष्टी, जसे की अवमूल्यीकरण, दीर्घ-कालीन कर्जावरील व्याज, आकस्मिकता राखीवात अभिदान, आणि इक्विटीवर परतावे, यांना वास्तविक आणि वायर व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय, यांच्या जवळपास 97.6:2.4 च्या प्रमाणातील असलेल्या फीक्स्ड मालमत्तेच्या आधारावर अंदाजित स्वतंत्रपणे वायर व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांच्या अंतर्गत विचारात घेतले गेलेले आहे

### 4.2 उर्जा विक्री

नियंत्रण कालावधीसाठीच्या उर्जा विक्रीच्या प्रस्तुतीसाठी, एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष 2015-16 साठीच्या उर्जेच्या अंदाजित विक्रीस पाया म्हणून विचारात घेतले आहे, एप्रिल 2015 महिन्यामध्ये विक्री सामान्यीकृत केल्यानंतर, ज्याच्या दरम्यान संक्रिया कालवधी केवळ 22 दिवसांचा होता.

एमबीपीपीएलने श्रेणी-नुसार नियंत्रण कालावधीसाठी उर्जा विक्रीस खालील प्रमाणे प्रस्तावित केले आहे:

(अ) गत विक्री डेटा उपलब्ध नसल्याने, 1% चा सीएजीआरला अस्तित्वातील उपभोक्त्यांच्या नैसर्गिक वाढीस दर्शवण्यास विचारात घेतले जात आहे.

(ब) इमारत क्र. 9 & 12 च्या अतिरिक्त ताब्याच्या कारणाने आर्थिक वर्ष 2016-17 मध्ये 0.5 एमयुची अतिरिक्त विक्री विचारात घेतलेली आहे.

(क) इमारत क्र. 15 च्या वाढीव एफएसायने बांधकामासाठी आवश्यक असलेल्या बांधकाम उर्जेस, आर्थिक वर्ष 2016-17 मध्ये 0.3 एमयुची अतिरिक्त विक्री विचारात घेतलेली आहे.

(ड) आर्थिक वर्ष 2017-18 आणि 2018-19 मध्ये 1 एमयु आणि 0.5 एमयुच्या अतिरिक्त विक्रीस इमारत क्र. 15 च्या अंशिक ताब्याच्या कारणाने तसेच 0.5 एमयु आर्थिक वर्ष 2019-20 मध्ये इमारत क्र. 15 च्या पुढील संपूर्ण ताब्याच्या कारणाने विचारात घेतला गेलेला आहे.

(ई) आर्थिक वर्ष 2019-20 पर्यंत इमारत क्र. 15 चे बांधकाम पूर्ण होण्याची शक्यता असल्याने, आर्थिक वर्ष 2019-20 मध्ये बाधकाम उर्जेसाठी विचारात घेतलेली अतिरिक्त विक्री कमी केली गेली आहे.

## 4.3 वितरण तोटा

वास्तविक डेटाच्या आधारावर, एप्रिल 2015 ते डिसेंबर 2015 दरम्यानच्या कालावधीसाठी वितरण तोटा बिल केलेल्या परिवर्तन शुल्कांस वगळून 0.58% होता. पुढे, एमबीपीपीएलने प्राथमिकतेन 22 केवीच्या उच्च वोल्टेज पातळीवर स्थापित केलेले आहे, आणि त्याचा परिणाम म्हणून, पुरवठा क्षेत्रात संरचनेत तंत्रज्ञान तोट्याच्या कारणाने वितरण तोटे फारच कमी आहेत.

## 4.4 उर्जा शेष

एमबीपीपीएलने एमएसएलडीसी द्वारे बनवल्या गेलेल्या स्टेट ग्रिड लॉस अकाऊंट्सच्या आधारावर एप्रिल 2015 ते नोव्हेंबर 2015 पर्यंतच्या काळासाठी 3.97% चा वास्तविक आंतर-राज्य पारेषण तोटा विचारात घेतलेला आहे, आणि नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित विक्री आणि वितरण तोट्याच्या आधरावर उर्जा गरजेचा प्रस्ताव दिलेला आहे.

## 4.5 उर्जा खरेदी खर्च

एमबीपीपीएलने नियंत्रण कालावधीसाठी उर्जा खरेदीसाठी मुल्ये खालीलप्रमाणे प्रस्तावित केलेली आहेत:

**तक्ता 4-1: नियंत्रण कालावधीसाठीप्रस्तावित वीज खरेदी दर**

| विवरण | स्त्रोत | आर्थिक वर्ष 2016-17 | आर्थिक वर्ष 2017-18 | आर्थिक वर्ष 2018-19 | आर्थिक वर्ष 2019-20 |
|---|---|---|---|---|---|
| वीज खरेदी क्षमता (एमयु) द. ल.यु. | मध्य अवधि पीपीए अनुसार बेस लोड साठी स्त्रोत | 74.46 | 74.46 | 74.46 | 74.46 |
| | मध्य अवधि पीपीए अनुसार पीक लोड साठी स्त्रोत | 35.90 | 35.90 | 35.90 | 35.90 |
| | सोलर आरपीओ साठी खरेदी | 1.00 | 1.70 | 2.38 | 3.11 |
| | सोलर आरपीओव्यतिरिक्त साठी खरेदी | 9.99 | 11.91 | 13.09 | 14.30 |
| | अतिरिक्त वीजेची विक्री | (21.45) | (10.54) | (6.86) | (3.42) |
| | **एकूण** | **99.91** | **113.43** | **118.97** | **124.35** |
| वीज खरेदी मुल्य (रू. कोटी) | मध्य अवधि पीपीए अनुसार बेस लोड साठी स्त्रोत | 27.94 | 27.94 | 27.94 | 27.94 |
| | मध्य अवधि पीपीए अनुसार पीक लोड साठी स्त्रोत | 13.47 | 13.47 | 13.47 | 13.47 |
| | सोलर आरपीओ साठी खरेदी | 0.71 | 1.20 | 1.68 | 2.20 |
| | सोलर आरपीओव्यतिरिक्त साठी खरेदी | 5.69 | 6.79 | 7.46 | 8.15 |
| | अतिरिक्त वीजेची विक्री | (8.05) | (3.96) | (2.58) | (1.29) |
| | **एकूण** | **39.77** | **45.45** | **47.98** | **50.48** |
| सरासरी वीज खरेदी मुल्य | मध्य अवधि पीपीए अनुसार बेस लोड साठी स्त्रोत | 3.75 | 3.75 | 3.75 | 3.75 |

| विवरण | स्त्रोत | आर्थिक वर्ष 2016-17 | आर्थिक वर्ष 2017-18 | आर्थिक वर्ष 2018-19 | आर्थिक वर्ष 2019-20 |
|---|---|---|---|---|---|
| | मध्य अवधि पीपीए अनुसार पीक लोड साठी स्त्रोत | 3.75 | 3.75 | 3.75 | 3.75 |
| | सोलर आरपीओ साठी खरेदी | 7.07 | 7.07 | 7.07 | 7.07 |
| | सोलर आरपीओव्यतिरिक्त साठी खरेदी | 5.70 | 5.70 | 5.70 | 5.70 |
| | अतिरिक्त वीजेची विक्री | 3.75 | 3.75 | 3.75 | 3.75 |
| | **एकूण** | **3.98** | **4.01** | **4.03** | **4.06** |

## 4.6 पारेषण शुल्के आणि एमएसएलडीसी शुल्के

एमबीपीपीएलने एसटीओए उपभोक्ता म्हणून सध्या अदा करत असलेल्या शुल्कांच्या आधारावर नियंत्रण कालावधीत हाताळल्या जाणाऱ्या उर्जेसाठी पारेषण शुल्के रू. 0.26/युनिट या दराने आकारण्याचे प्रस्तावित केले आहे. पुढे, एमएसडीएलसी शुल्के आर्थिक वर्ष 2015-16 साठी अंदाजित 0.09 कोटीच्या त्याच रकमेस प्रस्तावित केली आहेत.

सध्या, एमबीपीपीएल शॉर्ट टर्म ओपन एक्सेस कंझ्यूमरच्या रूपाने पारेषण शुल्के आणि एमएसएलडीसी शुल्के अदा करत आहे, कारण की एमबीपीपीएलला अजुन दीर्घ-कालीन पीपीएमध्ये शिरायच बाकी आहे, जी एमइआरसी (पारेषण मुक्त प्रवेश) नियमावाली, 2014 मधील एक अनिवार्यता आहे. तथापि, एक वितरण परवानाधारक म्हणून, एमइआरसी एमवायटी नियमावाली, 2015 च्या अनुसार एमबीपीपीएल टीटीएससी आणि एमएसएलडीसी शुल्के भागण्यास हक्कप्राप्त आहे. या संदर्भात, एमबीपीपीएल नम्रपणे अशी विनंती करते की, वितरण परवानाधारकांद्वारे नियंत्रण कालावधीसाठी देय पारेषण शुल्कांचे निर्धारण करत असताना माननीय आयोगाने एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 मधील नियमानुसार नियंत्रण कालावधीत देय टीटीएससी आणि एमएसएलडीसी शुल्कांमधील त्यांच्या वाट्याचे निर्धारण करावे. एकदा का माननीय आयोगाने एमबीपीपीएलच्या वाट्याच्या पारेषण शुल्कांचे आणि एमएसएलडीसी शुल्कांचे निर्धारण केले, की त्यालाच माननीय आयोगाने नियंत्रण कालावधीसाठी एमबीपीपीएलसाठी एआरआर अनुमोदित करत असताना विचारात घ्यावे.

## 4.7 संचालन आणि देखभाल खर्च

एमबीपीपीएलसाठी, संचालन व देखभाल खर्चांचे निर्धारण एका मामला-विशिष्ट आधारावर करायला हवे. वरील गोष्टींचा विचारात घेत, एमबीपीपीएलने नियंत्रण कालावधीसाठी त्याच्या संचालन व देखभाल खर्चांस खालील प्रमाणे प्रस्तावित केलेले आहे:

(अ) आर्थिक वर्ष 2015-16 साठी अंदाजित कर्मचारी खर्च, प्रशासन विषयक व सर्वसाधारणखर्च आणि दुरूस्ती व देखभाल खर्च यांना पायाभूत खर्च म्हणून विचारात घेतले आहे आणि नियंत्रण

कालावधीसाठी संचालन व देखभाल खर्च अनुजात करण्यासाठी रास्त वृध्दी घटकास विचारात घेतलेले आहे.

(ब) कर्मचारी खर्चांच्या संदर्भात, एमबीपीपीएल त्याची पालक संघटना केआरसीएसपीएल बरोबर एका कॉर्पोरेट सेवा करारात सामील झाली आहे. या करारानुसार, केआरसीएसपीएलला आर्थिक वर्ष 2015-16 साठी 35 पैसे प्रति विकलेल्या उर्जा युनिट या दराने कर्मचारी खर्च देय असतील आणि पुढील 12% वाढ दर वर्षी लागू केली जावी, पुढे येणाऱ्या वर्षांच्या मानकांकडे पोहोचण्यासाठी.

(क) दुरूस्ती व देखभाल खर्चासंदर्भात, एमबीपीपीएल वितरण प्रणालीच्या दुरूस्ती आणि देखभाल साठी वत्स इलेक्ट्रीक कंपनीसोबत एका करारात सामील झाले आहेत. या करारात, आगामी वर्षांसाठीचे दुरूस्ती व देखभाल खर्च प्रस्तावित करण्यासाठी 7% चा वाढ घटक विचारात घेतलेला आहे. त्यानुसार, हाच वाढ घटक नियंत्रण कालावधीसाठी विचारात घेतलेला आहे.

(ड) प्रशासन विषयक व सर्वसाधारणखर्चांच्या संदर्भात, 5.84%चा वाढीव घटक विचारात घेतलेला आहे जो आधारित असेल पाच वर्षांच्या सरासरी महागाई घटकावर ज्यात डब्ल्यूपीआयसाठी 60% आणि सीपीआयसाठी 40% अधिभार विचारात घेतलेला असेल, माननीय आयोगाने अन्य युटीलिटीजसाठीच्या आधीच्या वीज दर आदेशात ज्या सरणीस दुजोरा दिला त्याच्या अनुसार.

पुढे, आबंटन आधारक निर्देशित असल्यानुसार, संचालन व देखभाल खर्च 65:35 च्या प्रमाणात वायर व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसायांदरम्यान आबंटित केले गेलेत.

## 4.8 भांडवली खर्च आणि भांडवलीकरण

आगामी वर्षांसाठी, आधी नमूद केल्यानुसार एमबीपीपीएलने भांडवलीकरण प्रस्तावित केले आहे जेणेकरून नियंत्रण कालावधीदरम्यान प्रस्तावित मागणी मिळवता येईल आणि इमारतींचा विकासही. एमबीपीपीएलने डीपीआर योजनांव्यतिरिक्तमध्ये भांडवलीकरणास प्रस्तावित केले आहे कारण की गुंतवायचे भांडवल हे 10 कोटीहून कमी आहे. आर्थिक वर्ष 2019-20 साठी भांडवलीकरण प्रस्तावित नाही, कारण असे अपेक्षित आहे की आर्थिक वर्ष 2019-20 मध्ये इमारत 15 पूर्णपणे व्याप्त झालेली असेल, आणि बांधकाम आर्थिक वर्ष 2018-19 मध्ये पूर्ण केले जाईल.

एमबीपीपीएलने केवळ डीपीआर योजनांव्यतिरिक्तसाठीच भांडवली खर्च प्रस्तावित केला आहे. एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 च्या संदर्भाने, एमबीपीपीएल नम्रपणे म्हणते की ते एक अनन्य वितर्ण परवानाधारक आहेत जे केवळ आयटी आणि आयटीइएस विनिर्दिष्ट उपभोक्त्यांनाच एका लहानशा क्षेत्रासाठी पुरवठा करत आहे. एमबीपीपीएलच्या मामल्यात, त्याच्या पुरवठा क्षेत्रातील वितरण प्रणालीचा मोठा भाग आधीच मांडलेला आहे, आणि संबंधित भांडवल खर्चाच्या अनुमोदनासाठीचे आवेदन आधीच माननीय आयोगाला डीपीआरसह जमा केलेल आहे. म्हणूनच, एमबीपीपीएलच्या मामल्यात, डीपीआर योजनांसाठीचे भांडवली खर्च दर वर्षी आवश्यक असणार नाहीत, आणि म्हणूनच, वरील 23.6 मानदंड एमबीपीपीएलसाठी शिथिल केला जावा, अन्यथा, एमबीपीपीएल नियंत्रण कालावधीत कसलाच भांडवली खर्च अंगिकारू शकणार नाही.

## 4.9 कर्ज:इक्विटी प्रमाण

एमबीपीपीएलने एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 च्या नियम 26 अनुसार 70:30 चे सामान्यीकृत प्रमाण विचारात घेतले आहे. पुढे, पुढील विभागात चर्चा केल्या नुसार, एमबीपीपीएलने शुल्कांचे कसलेही वेळापत्रक न लादण्याचे प्रस्तावित केले आहे, त्यामुळे, नियंत्रण कालावधीसाठी शून्य उपभोक्ता अधिदान प्रस्तावित आहे.

## 4.10 अवमूल्यीकरण

एमबीपीपीएलने एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 च्या नियम 27 अनुसार, वर्षामधील सरासरी जीएफएवर 5.28% च्या सरासरी अवमूल्यीकरणाचा दर लावून, वायर वितरण व किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय अशा दोघांसाठी स्वतंत्रपणे अवमूल्यीकरणाची गणना केली आहे

## 4.11 कर्जावरील व्याज

एमबीपीपीएलने एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 च्या नियम 29 अनुसार, कर्जावरील व्याजाची गणना केली आहे. डीपीआर योजनांव्यतिरिक्तसाठी प्रस्तावित भांडवलीकरणासाठी, एमबीपीपीएलचा आयडीएफसी बँक लि. कडून आणखी कर्ज घ्यायचा मनसुबा आहे जेणेकरून प्रस्तावित भांडवली खर्चास अर्थसहाय्य होईल. एकाच स्त्रोताकडून अदत्त कर्ज असल्याने, कर्जावरील व्याज गणना करण्यासाठी 10.90 % चा व्याजदर विचारात घेतलेला आहे. कर्जाची सामान्यीकृत परतफेड ही एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 च्या अनुसार,वर्षासाठीच्या प्रस्तावित अवमूल्यीकरणाच्या समान मानली गेली आहे.

## 4.12 कार्यशील भांडवल आणि उपभोक्ता सुरक्षा ठेवींवरील व्याज

एमबीपीपीएलने एमईआरसी एमवायटी नियमावली, 2015 च्या नियम 31 नुसार कार्यशील भांडवलावरील सामान्यीकृत व्याजाची गणना केली. कार्यशील भांडवलाच्या गरजेची गणना करण्यासाठी, सध्याच्या दराने विकल्या जाणाऱ्या वीजेपासून येणाऱ्या महसूलास विचारात घ्यावे लागेल. एमबीपीपीएलसाठीचे सध्याचे वीज दर हे मिश्रितपणे वितरण वायर आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यासाठी लागू आहे, म्हणूनच,वायर आणि पुरवठा व्यवसाय यांसाठी स्वतंत्र महसूलाचे सध्याच्या दराने निर्धारण होऊ शकले नाही. म्हणूनच, एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 मध्ये निर्देशित असल्याप्रमाणे कार्यशील भांडवलावरील व्याज संमिश्र व्यवसायांसाठी मोजले गेले आणि त्यानंतर वायर व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांना आबंटित केले गेले.

एमबीपीपीएलने मागील वर्षीच्या उपभोक्ता सुरक्षा ठेव रकमेशी एका महिन्याच्या सरासरी वाढीव महसूलास जोडून उपभोक्ता सुरक्षा ठेवींना प्रस्तावित केले आहे. याचिका सादर करण्याच्या तारखेस लागू असलेला एसबीआय बेस दर (9.30%) अधिक 150 बेसिस पॉईंट्स विचारात घेत कार्यशील भांडवल आणि उपभोक्ता सुरक्षा ठेवींवरील व्याजाच्या गणनेसाठीचा व्याज दर हा 10.80% असा विचारात घेतलेला आहे.

## 4.13 इक्विटीवर परतावे

एमबीपीपीएलने एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 मधील नियम 28 नुसार वितरण वायर आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांसाठी स्वतंत्रपणे इक्विटी भांडवलावरील परतावे मोजले आहेत.

## 4.14 आय कर

एमबीपीपीएलसाठी ताज्या लेखा परीक्षण केलेल्या खात्यांचे वास्तविक आय कर उपलब्ध नाहीत, कारणकी त्यास वितरण परवानाधारक म्हणून वर्ष पूर्ण व्हायचे आहे. पुढे, एमबीपीपीएल, एसइझेड विकासक असल्याच्या नैतिकतेन काही अन्य व्यवसायांतही सामील झाले आहेत,आणि म्हणूनच, एमबीपीपीएलद्वारे अदा केलेला/भरावयाचा आय कर नियम 33.1 च्या अटीनुसार नियामक वितरण व्यवसायास आबंटित केला जावा.

म्हणूनच, एमबीपीपीएलने आर्थिक वर्ष 2015-16 साठीच्या नियंत्रण कालावधीसाठी मोजमाप केलेल्या आय करास विचारात घेतले आहे, आणि तोच एमइआरसी एमवायटी नियमावली, 2015 मध्ये निर्देशित केलेल्या आबंटन साच्याचा आधारावर वायर व्यवसाय आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसायास आबंटित केले.

## 4.15 बुडवलेल्याकर्जासाठी तरतूद

एमबीपीपीएलने अशोध्य कर्जांसाठी कसलीच तरतूद केलेली नाही कारण की त्याच्याकडे नियंत्रण कालावधीदरम्यान प्राप्त होण्यास अपेक्षित असे काहीच नाही, तसेच आर्थिक वर्ष 2015-16 साठी लेखा परीक्षित खाती सध्या उपलब्ध नाहीत, ज्यामुळे प्राप्त होण्याजोग्या काही रकमा असल्यासही, त्या माहीत नाहीत.

## 4.16 आकस्मिकता राखीवमध्ये अभिदान

एमबीपीपीएलने एमईआरसी एमवायटी नियमावली, 2015 चा नियम 34 च्या अनुसार स्थिर मालमत्तेच्या मूळ मुल्याच्या 0.5% अभिदानास आकस्मिकता राखीवसाठी विचारत घेतले आहे.

## 4.17 वीज दराव्यतिरिक्त मिळकत

एमबीपीपीएलने रिटेल पुरवठा व्यवसायासाठी निविदा दस्तावेज विक्रीच्या कारणाने 0.01 कोटीची वीज दराव्यतिरिक्त मिळकत प्रस्तावित केली आहे. कसलीही वीज दराव्यतिरिक्त मिळकत वितरण वायर व्यवसायासाठी वर्तवलेली नाही.

## 4.18 एकंदर महसूल आवश्यकता

नियंत्रण कालावधीसाठी वितरण वायर व्यवसायासाठी प्रस्तावित एआरआरचा गोषवारा खालील तक्त्यात दिलेला आहे:

तक्ता 4-2: नियंत्रण कालावधीसाठी वितरण वायर व्यवसायासाठी प्रस्तावित एआरआर (रू. कोटी)

| अनु. क्र. | विवरण | आर्थिक वर्ष 2016-17 | आर्थिक वर्ष 2017-18 | आर्थिक वर्ष 2018-19 | आर्थिक वर्ष 2019-20 |
|---|---|---|---|---|---|
| 1. | संचालन व देखभाल खर्च | 3.82 | 4.56 | 5.19 | 5.90 |
| 2. | अवमूल्यीकरण | 5.00 | 5.23 | 5.63 | 5.81 |
| 3. | भांडवली कर्जावरील व्याज | 6.41 | 6.18 | 6.16 | 5.80 |
| 4. | कार्यशील भांडवलावरील व्याज | 0.02 | 0.02 | 0.02 | 0.02 |
| 5. | उपभोक्ता सुरक्षा ठेवीवरील व्याज | 0.05 | 0.05 | 0.06 | 0.06 |
| 6. | बुडवलेली कर्ज आणि संशयितांसाठी तरतूद | - | - | - | - |
| 7. | आकस्मिकता राखीवांत अभिदान | 0.47 | 0.48 | 0.52 | 0.55 |
| 8. | आयकर | 0.99 | 0.99 | 0.99 | 0.99 |
| 9. | **एकूण महसूल खर्च** | **16.76** | **17.51** | **18.55** | **19.12** |
| 10. | इक्विटीवरील परतावे | 4.38 | 4.58 | 4.93 | 5.09 |
| 11. | **एकंदर महसूल आवश्यकता** | **21.14** | **22.09** | **23.48** | **24.22** |
| 12. | वजा: वीज दराव्यतिरिक्त दर मिळकत | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 13. | **एकूण एकंदरित महसूल आवश्यकता** | **21.14** | **22.09** | **23.48** | **24.22** |

एमबीपीपीएल माननीय आयोगाला नियंत्रण कालावधीसाठी वायर व्यवसायासाठी प्रस्तावित एआरआर अनुमोदनाची विनंती करते, जे वरील तक्त्यात दाखवले गेले आहे.

नियंत्रण कालावधीसाठी रिटेल पुरवठा व्यवसायासाठी प्रस्तावित एआरआरचा गोषवारा खालील तक्त्यात दिलेला आहे:

तक्ता 4-3: नियंत्रण कालावधीसाठी किरकोळ वीज पुरवठा व्यवसायासाठी प्रस्तावित एआरआर
(रू. कोटी)

| अनु. क्र. | विवरण | आर्थिक वर्ष 2016-17 | आर्थिक वर्ष 2017-18 | आर्थिक वर्ष 2018-19 | आर्थिक वर्ष 2019-20 |
|---|---|---|---|---|---|

| अनु. क्र. | विवरण | आर्थिक वर्ष 2016-17 | आर्थिक वर्ष 2017-18 | आर्थिक वर्ष 2018-19 | आर्थिक वर्ष 2019-20 |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वीज खरेदी दर | 39.77 | 45.45 | 47.98 | 50.48 |
| 2. | संचालन व देखभाल खर्च | 2.06 | 2.46 | 2.79 | 3.18 |
| 3. | अवमूल्यीकरण | 0.13 | 0.14 | 0.14 | 0.14 |
| 4. | भांडवली कर्जावरील व्याज | 0.17 | 0.16 | 0.15 | 0.14 |
| 5. | कार्यशील भांडवलावरील व्याज | 0.16 | 0.15 | 0.16 | 0.16 |
| 6. | उपभोक्ता सुरक्षा ठेवीवरील व्याज | 0.42 | 0.48 | 0.50 | 0.52 |
| 7. | बुडवलेली कर्ज आणि संशयितांसाठी तरतूद | - | - | - | - |
| 8. | आकस्मिकता राखीवांत अभिदान | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 |
| 9. | आंतर-राज्य पारेषण प्रभार | 3.16 | 3.22 | 3.27 | 3.32 |
| 10. | एमएसएलडीसी शुल्क & प्रभार | 0.09 | 0.09 | 0.09 | 0.09 |
| 11. | आयकर | 0.11 | 0.11 | 0.11 | 0.11 |
| 12. | **एकूण महसूल खर्च** | **46.07** | **52.27** | **55.21** | **58.14** |
| 13. | इक्विटीवरील परतावे | 0.13 | 0.13 | 0.14 | 0.14 |
| 14. | **एकंदर महसूल आवश्यकता** | **46.20** | **52.41** | **55.34** | **58.28** |
| 15. | वजा: वीज दराव्यतिरिक्त मिळकत | 0.01 | 0.01 | 0.01 | 0.01 |
| 16. | **एकूण एकंदरित महसूल आवश्यकता** | **46.20** | **52.40** | **55.33** | **58.27** |

एमबीपीपीएल माननीय आयोगाला नियंत्रण कालावधीसाठी किरकोळ वीज पुरवठा व्यवसायासाठी प्रस्तावित एआरआर अनुमोदनाची विनंती करते, जे वरील तक्त्यात दाखवले गेले आहे.

# 5 एमवायटी नियंत्रण कालावधीसाठी टैरिफ धारणा आणि वीज दर रचना

## 5.1 सध्याच्या वीज दराला महसूल पोकळी/(अतिरिक्त)

सध्याचे वीज दर हे वितरण वायर आणि किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यासाठी संमिश्रपणे लागू आहे, म्हणूनच, नियंत्रण कालावधीसाठी एकत्रित महसूल पोकळी प्रस्तावित केली आहे.

तक्ता 5-1: सध्याच्या वीज दराला नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित एकत्रित महसूल पोकळी/(अतिरिक्त) (रू. कोटी)

| अनु. क्र. | विवरण | आर्थिक वर्ष 2016-17 | आर्थिक वर्ष 2017-18 | आर्थिक वर्ष 2018-19 | आर्थिक वर्ष 2019-20 |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वितरण वायर व्यवसायासाठी एआरआर | 21.14 | 22.09 | 23.48 | 24.22 |
| 2. | किरकोळ वीज पुरवठा व्यवसायासाठी एआरआर | 46.20 | 52.40 | 55.33 | 58.27 |
| 3. | वायर व्यवसाय & किरकोळ वीज पुरवठा यांसाठी एकत्रित एआरआर | 67.33 | 74.49 | 78.81 | 82.49 |
| 4. | वजा: सध्याच्या वीज दराचे महसूल | 64.20 | 72.13 | 74.82 | 76.56 |
| **5.** | **महसूल पोकळी/(अतिरिक्त)** | **3.13** | **2.35** | **3.99** | **5.92** |
| 6. | जोडा: आर्थिक वर्ष 2015-16 साठी महसूल पोकळी/(अतिरिक्त) | (0.44) | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **7.** | **अंतिम महसूल पोकळी/(अतिरिक्त)** | **2.69** | **2.35** | **3.99** | **5.92** |

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की नियंत्रण कालावधीच्या प्रत्येक वर्षी महसूल पोकळी आहे, कारण की अस्तित्वातील वीज दर वायर व्यवसाय आणि किरकोळ वीजपुरवठा व्यवसायाच्या एआरआरला गाठू शकत नाही. यामुळेच, वायर व्यवसाय आणि किरकोळ वीजपुरवठा व्यवसायाच्या एआरआरच्या वसुलीसाठी वीज दर वाढवणे आवश्यक आहे.

त्यानुसार, एमबीपीपीएलने वायर व्यवसाय आणि किरकोळ वीजपुरवठा व्यवसायाच्या एआरआरच्या वसुलीसाठी आवश्यक महसूलासाठी वीज दर वाढवण्याचे नक्की केले आहे. अशा महसूल आवश्यकतेच्या गरजेचे मोजमाप करत

असताना, आर्थिक वर्ष 2015-16 मधील अतिरिक्त महसूल आर्थिक वर्ष 2015-16 साठीच्या किरकोळ वीजपुरवठा व्यवसायाच्या एआरआरसाठी विचारात घेतले आहे. नियंत्रण कालावधीसाठी सुधारित वीज दराद्वारे वसुली करायच्या महसूलाची आवश्यकता खालीलप्रमाणे निर्धारित केलेली आहे:

तक्ता 5-2: सुधारित वीज दराने नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित महसूल आवश्यकता (रू. कोटी)

| अनु. क्र. | विवरण | आर्थिक वर्ष **2016-17** | आर्थिक वर्ष **2017-18** | आर्थिक वर्ष **2018-19** | आर्थिक वर्ष **2019-20** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वितरण वायर व्यवसायासाठी एआरआर | 21.14 | 22.09 | 23.48 | 24.22 |
| 2. | किरकोळ वीज पुरवठा व्यवसायासाठी एआरआर | 45.75 | 52.40 | 55.33 | 58.27 |
| 3. | वायर व्यवसाय & किरकोळ वीज पुरवठा व्यवसाय यांसाठी एकत्रित एआरआर | 66.89 | 74.49 | 78.81 | 82.49 |
| 4. | पुरवठ्याचे सरासरी मुल्य (रू./युनिट) | 7.01 | 6.88 | 6.94 | 6.95 |

## 5.2 वीज वहन प्रभाराचे निर्धारण

म्हणूनच, एचटी आणि एलटी श्रेणीसाठी वायर व्यवसायासाठीच्या एआरआरच्या आधारावर सामान्य वीज वहन प्रभार आणि प्रस्तावित उर्जा विक्री खालीलप्रमाणे प्रस्तावित केले गेलेत:

तक्ता 5-3: नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित वीज वहन प्रभार

| अनु. क्र. | विवरण | आर्थिक वर्ष **2016-17** | आर्थिक वर्ष **2017-18** | आर्थिक वर्ष **2018-19** | आर्थिक वर्ष **2019-20** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | वितरण वायर व्यवसायासाठी एआरआर (रू. कोटी) | 21.14 | 22.09 | 23.48 | 24.22 |

| अनु. क्र. | विवरण | आर्थिक वर्ष 2016-17 | आर्थिक वर्ष 2017-18 | आर्थिक वर्ष 2018-19 | आर्थिक वर्ष 2019-20 |
|---|---|---|---|---|---|
| 2. | उर्जा विक्री (एमयु) | 95.39 | 108.30 | 113.59 | 118.72 |
| 3. | वीज वहन प्रभार (रू./युनिट) | 2.22 | 2.04 | 2.07 | 2.04 |

एमबीपीपीएल माननीय आयोगाला नियंत्रण कालावधीसाठी वर प्रस्तावित केल्याप्रमाणे वीज वहन प्रभारांच्या अनुमोदनाची विनंती करते.

## 5.3 किरकोळ वीज पुरवठा वीज दरासाठीची धारणा

एमबीपीपीएल नियंत्रण कालावधीसाठी किरकोळ वीज पुरवठा वीज दराच्या निर्धारणासाठी पुढील वीज दर धारणेस प्रस्तावित करते:

### क्रॉस सबसिडीस कमी करणे

सध्या, एमबीपीपीएल पुरवठा करत असलेल्या क्षेत्रास लागू सिलिंग वीज दर हे एमएसइडीसीएलचे औद्योगिक आणि वाणिज्यिक श्रेणीसाठीचे वीज दर आहे. एमएसइडीसीएलच्या पुरवठा क्षेत्रातील उपभोक्ता श्रेणींदरम्यानच्या क्रॉस सबसिडी एक ऐतिहासिक उत्तरदान आहे, आणि माननीय आयोग दर वर्षी उचित वीज दर संरचनेच्या माध्यमाने पार अनुदानास कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. जर तीच वीज दर रचना एमबीपीपीएलच्या पुरवठा क्षेत्रात निरंतर ठेवली गेल्यास, वाणिज्यिक आणि औद्योगिक उपभोक्त्यांदरम्यान क्रॉस सबसिडी ढाचा चालू राहील.

वीज अधिनियम, 2003 विकसनशील पध्दतीने परवानाधारकाच्या पुरवठा करण्याच्या क्षेत्रात पार अनुदानास क्रमवार कमी करण्याचेही प्रयोजन करते. वीज अधिनियम, 2003 च्या या उद्दिष्ट्यास साध्य करण्यासाठी, तसेच, एमबीपीपीएलचे वीज दर पहिल्यांदाच निर्धारणाधीन असल्याकारणाने, एमबीपीपीएलचे इच्छा आहे की सुरूवातीपासूनच, त्याच्या पुरवठा क्षेत्रात उपभोक्ता श्रेणींदरम्यान क्रॉस सबसिडी नाही आहे. म्हणूनच, एमबीपीपीएलने श्रेणीनुसार अशा पध्दतीने टॅरिफ्स प्रस्तावित केली आहेत की प्रत्येक उपभोक्ता श्रेणीसाठी सरासरी बिल दर (एबीआर) पुरवठ्याच्या सरासरी मुल्याच्या (एसीओएस) समान असावा. यामुळे एमबीपीपीएलच्या पुरवठा क्षेत्रात पार अनुदानास कमी करेल/त्याचे उन्मूलन करेल आणि उपभोक्त्यांस फायदा होईल.

## वीज दर श्रेणीचे परिमेयीकरण

एमबीपीपीएलच्या पुरवठा क्षेत्रात लागू अस्तित्त्वातील टॅरीफ वेळापत्रकात दोन एचटी श्रेणी, एचटी औद्योगिक (एचटी-I) आणि एचटी वाणिज्यिक (एचटी-II) म्हणून, तसेच एलटी श्रेणी ज्यात तीन आणि दोन उप-श्रेण्या आहेत, एलटी वाणिज्यिक (एलटी-II-ए, एलटी II-बी आणि एल्टी-II-सी) आणि एलटी औद्योगिक (एलटी V-ए आणि एलटी V-बी) नावाच्या.

एमबीपीपीएलने सुधारित वीज दरासाठी पुढील श्रेणी/उप-श्रेणींना प्रस्तावित केले आहे:

(अ) एचटी पुरवठा श्रेणी (एचटी)

(ब) एलटी पुरवठा श्रेणी आणि भार ≤ 20 kW (एलटी ए)

(क) एलटी पुरवठा श्रेणी आणि भार 20 kW च्या वर (एलटी बी)

## टिओडी वीजदर

एमबीपीपीएलच्या पुरवठा क्षेत्रात टीओडी वीज दराशी संबंधित समस्यांचा गोषवारा खालील प्रमाणे आहे:

(अ) एमबीपीपीएल क्षेत्रातील उपभोक्त्यांचे ठराविक भार पॅटर्न आहेत आणि ठराविक कामकाजी तासांमध्ये त्यांना पाहिले जाते. अशा उपभोक्त्यांचे भार रात्रीच्या तासांस केवळ रात्रीस ऑफ पिक सूट मिळते म्हणून पालटण्याची शक्यता नसते.

(ब) टीओडी टॅरिफ्सचे उद्दिष्ट्य उपभोक्ते त्यांचा खप पालटू शकत नसल्याने त्यांच्याकडून अतिरिक्त महसूल मिळवण्याचे नसून, शिगेच्या तासांपासून शिगेच्या तासांव्यतिरिक्त बदलून खपास लाभांश मिळावा हे आहे, जेणेकरून वीज खरेदी मुल्य इष्टतम होईल.

(क) एसइझेड क्षेत्राचा भार पॅटर्न समजून घेतल्यावर, एमबीपीपीएलने दोन वेगळया निर्धारित वेळांसाठी करार करून आधीच त्याच्या वीज खरेदी खर्चाला इष्टतम केले आहे.

(ड) एमबीपीपीएलकडे दुपारच्या तासांत शिगेचा भार असतो, म्हणूनच, संध्याकाळच्या शिगेच्या लोडना दुपारच्या वेळांमध्ये पालटण्याची काहीच गरज नाही.

वरील गोष्टींस अनुसरून, एमबीपीपीएल त्याच्या पुरवठा क्षेत्रासाठी दिवस वीज दराचा वेळ खंडित करण्यास प्रस्तावित करतो. एमबीपीपीएल माननीय आयोगाला नम्रपणे आर्थिक वर्ष 2016-17 च्या पुढे दिवसाच्या वीज दराची वेळ खंडित करण्यास मान्यता देण्याची विनंती करतो.

## हार्मोनिक्स दंडासाठी क्रियाविधी

वीजेच्या पुरवठ्याची गुणवत्ता अबाधित राखण्यासाठी, माननीय आयोगाने वितरण परवानाधारकांस वीजेच्या गुणवत्तेस निरंतर ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत तसेच वितरण परवानाधारकांसाठी आणि पुरवठा संहिता संपादणूकीच्या मानकांसही निर्दिष्ट केलेले आहे, ज्याने आयईईई एसटीडी 519-1992 चे पालन करावयास हवे.

एमबीपीपीएलद्वारे पुरवठा केली जाणारी वीज ही 5% व्हीटीएचडी ($V_{THD}$) विहित सुसंगत पातळीच्या आतच आहे. तथापि, आयटी आणि आयटीइएस उपभोक्त्यांचा भार प्रणालीमध्ये हार्मोनिक्स घालण्यास प्रवण असतो. आयईईई एसटीडी 519-1992 अनुसार, अनुमती देण्यायोग्य टोटल व्होल्टेज डिस्टॉर्शन ($V_{THD}$) पातळी आहे 5% आणि टोटल करंट डिस्टॉर्शन ($I_{THD}$), साठी 20% आहे. मे ते सप्टेंबर 2015 पर्यंत, एमबीपीपीएलने उपभोक्त्यांद्वारे वीज संरचनेत आणलेल्या हार्मोनिक्सना तपासण्यासाठी 115 चाचण्या केलेल्या आहेत. चाचणीच्या निकालात 43 उपभोक्त्यांनी अनुमती योग्य $I_{THD}$ पातळयांचे उल्लंघन केले आहे असे दिसून आले.

एमइआरसी पुरवठा संहितेत दिलेल्या कलमांच्या अणि अन्य राज्यातील प्राथमिकतेस पाहता, एमबीपीपीएल असे प्रस्तावित करतो की जे उपभोक्ते आयईईई एसटीडी 519-1992 मध्ये निर्देशित हार्मोनिक्स पातळयांचे उल्लंघन करेल त्यांवर 5% अतिरिक्त उर्जा प्रभार (वीज वहन प्रभार अधिक उर्जा प्रभार) चा हार्मोनिक्स दंड चालू करण्यात यावा.

## 5.4 नियंत्रण कालावधी आर्थिक वर्ष 2016-17 ते आर्थिक वर्ष 2019-20 करिता वीज दर प्रस्ताव

आधीच्या परिच्छेदात वीज दर धारणंबाबत चर्चा केल्याच्या आधारावर, एमबीपीपीएस त्याच्या पुरवठा क्षेत्रासाठी नियंत्रण कालावधी आर्थिक वर्ष 2016-17 ते आर्थिक वर्ष 2019-20 साठी पुढील वीज दराचा अशा प्रकारे प्रस्ताव ठेवते की प्रत्येक वीज दर श्रेणीसाठीचे सरासरी बिलिंग दर हे सरासरी पुरवठा मुल्याशी जुळते असेल.

तक्ता 5-4:नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित वीज दर

| वर्ष | उपभोक्ता श्रेणी | ठराविक प्रभार (रू./महिना) | उर्जा प्रभार (रू./युनिट) | वीज वहन प्रभार (रू/युनिट) |
|---|---|---|---|---|
| आर्थिक वर्ष | एचटी | 220 प्रति kVA | 4.23 | 2.22 |

| वर्ष | उपभोक्ता श्रेणी | ठराविक प्रभार (रू./महिना) | उर्जा प्रभार (रू./युनिट) | वीज वहन प्रभार (रू/युनिट) |
|---|---|---|---|---|
| | एलटी A (0-20 kW) | 220 | 4.61 | 2.22 |
| | एलटी बी (>20 kW) | 220 प्रति kVA | 3.94 | 2.22 |
| आर्थिक वर्ष 2017-18 | एचटी | 220 प्रति kVA | 4.33 | 2.04 |
| | एलटी A (0-20 kW) | 220 | 4.67 | 2.04 |
| | एलटी बी (>20 kW) | 220 प्रति kVA | 4.03 | 2.04 |
| आर्थिक वर्ष 2018-19 | एचटी | 220 प्रति kVA | 4.35 | 2.07 |
| | एलटी ए (0-20 kW) | 220 | 4.70 | 2.07 |
| | एलटी बी (>20 kW) | 220 प्रति kVA | 4.09 | 2.07 |
| आर्थिक वर्ष 2019-20 | एचटी | 220 प्रति kVA | 4.45 | 2.04 |
| | एलटी ए (0-20 kW) | 220 | 4.74 | 2.04 |
| | एलटी बी (>20 kW) | 220 प्रति kVA | 4.16 | 2.04 |

एमबीपीपीएल माननीय आयोगाला नम्रपणे विनंती करत की वर प्रस्तावित केल्याप्रमाणे नियंत्रण कालावधीसाठी श्रेणी-अनुसार वीज दराना मान्यता द्यावी

प्रस्तावित वीज दरामध्ये, प्रत्येक उपभोक्ता श्रेणीसाठीचा सरासरी बिलिंग दर हा सरासरी पुरवठा मुल्याशी जुळवला जातो, क्रॉस सबसिडी निष्कासनाचे प्रस्तावित आहे. नियंत्रण कालावधीदरम्यान प्रस्तावित क्रॉस सबसिडी प्रक्षेप पथ खालील तक्त्यात दिलेला आहे:

तक्ता 5-5: नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित क्रॉस-सब्सिडी प्रक्षेपपथ

| श्रेणी | आर्थिक वर्ष 2015-16 | आर्थिक वर्ष 2016-17 | आर्थिक वर्ष 2017-18 | आर्थिक वर्ष 2018-19 | आर्थिक वर्ष 2019-20 |
|---|---|---|---|---|---|
| | वीज दर आदेशात अनुमोदित | प्रस्तावित | प्रस्तावित | प्रस्तावित | प्रस्तावित |

| | केलेले | | | | |
|---|---|---|---|---|---|
| एचटी श्रेणी | 100% | 100% | 100% | 100% | 100% |
| एलटी ए (0-20 kW) | 85% | 100% | 100% | 100% | 100% |
| एलटी बी (0-20 kW) | 98% | 100% | 100% | 100% | 100% |

## 5.5 क्रॉस सबसिडी सरचार्जचे निर्धारण

एमबीपीपीएलने वीज दर पॉलिसीत विहित फॉर्म्युल्यास अंगिकारत खालील प्रमाणे सीएसएसची गणना केली आहे:

तक्ता 5-6: नियंत्रण कालावधीसाठी प्रस्तावित क्रॉस-सबसिडी सरचार्ज

| वर्ष | उपभोक्ता श्रेणी | टी | सी | एल | सी*(1+ एल%) | डी | सीएसएस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रू./युनिट | रू./युनिट | % | रू./युनिट | रू./युनिट | रू./युनिट |
| आर्थिक वर्ष | एचटी | 7.01 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.22 | 0.86 |

| वर्ष | उपभोक्ता श्रेणी | टी | सी | एल | सी*(1+ एल%) | डी | सीएसएस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रू./युनिट | रू./युनिट | % | रू./युनिट | रू./युनिट | रू./युनिट |
| | एलटी ए (0-20 kW) | 7.01 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.22 | 0.86 |
| | एलटी बी (>20 kW) | 7.01 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.22 | 0.87 |
| आर्थिक वर्ष 2017-18 | एचटी | 6.88 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.04 | 0.92 |
| | एलटी A (0-20 kW) | 6.88 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.04 | 0.92 |
| | एलटी बी (>20 kW) | 6.88 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.04 | 0.91 |
| आर्थिक वर्ष 2018-19 | एचटी | 6.94 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.07 | 0.95 |
| | एलटी ए (0-20 kW) | 6.94 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.07 | 0.95 |
| | एलटी बी (>20 kW) | 6.94 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.07 | 0.94 |
| आर्थिक वर्ष 2019-20 | एचटी | 6.95 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.04 | 0.99 |
| | एलटी ए (0-20 kW) | 6.95 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.04 | 0.99 |
| | एलटी बी (>20 kW) | 6.95 | 3.75 | 4.55% | 3.92 | 2.04 | 0.99 |

एमबीपीपीएल माननीय आयोगाला नम्रपणे विनंती करत की वर प्रस्तावित केल्याप्रमाणे नियंत्रण कालावधीसाठी श्रेणी-अनुसार क्रॉस सबसिडी अधिशुल्कांना मान्यता द्यावी.

## 5.6 प्रभाराचे पत्रक

माननीय आयोगाने त्यांच्या 13 जून, 2014 तारखेच्या आदेशाने एमबीपीपीलच्या पुरवठा क्षेत्रासाठी तेच प्रभाराचे वेळापत्रक मान्य केले आहे जे एमएसइडीसीएल पुरवठा क्षेत्रात लागू आहे.

एमबीपीपीएल एका संकुलात वसलेल्या उपभोक्त्यांना सेवा पुरवत आहे, म्हणूनच, तेथे उपभोक्त्यांस सेवा पुरवण्यास अतिरिक्त मुल्यांची गुंतवणूक नाही जसे की खंडन, पुन: जोडणी, जोडणीकरिता आवेदन ई. पुढे, एमबीपीपीएलने आधीच दुरूस्ती व देखभाल गतिविधी बाह्यस्त्रोतांकडे दिलेल्या आहेत, म्हणूनच, येथेही या अतिरिक्त सेवा उपभोक्त्यांस पुरवण्यासाठी अतिरिक्त खर्चाची गुंतवणूक करावी लागत नाही.

या सर्वांस पहाता, एमबीपीपीएल अस्तित्त्वातील प्रभाराच्या वेळापत्रकास आर्थिक वर्ष 2016-17 च्या पुढे खंडित करण्यास प्रस्तावित करते.

## 6 प्रार्थना

एमबीपीपीएल माननीय आयोगाला खालीलप्रमाणे प्रार्थना करते:

i. एमइआरसी (एमवायटी) नियमावली 2015 च्या नियमांनुसार वेळो वेळी सुधारणा केलेल्याप्रमाणे एमवायटी याचिकेस दाखल करून घ्यावे आणि माननीय आयोगासमोर पुढील कारवाईसाठी विचारात घेण्यात यावी;

ii. आर्थिक वर्ष 2015-16 साठी तात्कालिक ट्रुईंगअप आणि महसूल पोकळी/(अतिरिक्त) यांस अनुमोदन द्यावे आणि एमबीपीपीएलद्वारे प्रस्तावित केल्यानुसार, त्याची वसुली वीज दराच्या माध्यमाने केली जावी यांस अनुमोदन द्यावे;

iii. आर्थिक वर्ष 2016-17 ते आर्थिक वर्ष 2019-20 साठी एआरआरला अनुमोदित करावे आणि एमबीपीपीएलद्वारे प्रस्तावित केल्यानुसार, त्याची वसुली वीज दराच्या माध्यमाने व्हावी तसेच वीज दर वेळापत्रकास मान्यता द्यावी;

iv. एमबीपीपीएलच्या पारेषण प्रभार आणि एमएसएलडीसी प्रभार वाट्याचे निर्धारण करणे, आणि त्यालाच नियंत्रण कालावधीसाठी एमबीपीपीएलसाठी एआरआर मान्यता देताना विचारात घ्यावे.

v. उपभोक्त्यांकडून वसुली करायच्या प्रभार वेळापत्रकाच्या लेवीस खंडित करण्यास मान्यता देणे.

vi. ज्या क्षेत्राशी याचिका संबंधित आहे त्या क्षेत्रात विस्तृतरीत्या वितरीत होणाऱ्या कमीत कमी दोन इंग्रजी आणि दोन मराठी भाषिक दैनिकांमध्ये सार्वजनिक नोटीशीस प्रसिध्द करण्याच्या गरजेस सूट द्यावी.

vii. कुठल्याही अजाणतेपणाने झालेल्या वगळण्यास, त्रुटींस, कमतरतांस दुर्लक्षित करून एमबीपीपीएलला या फायलिंगला जोडण्यास/बदलण्यास/सुधारणा करण्यास/कमी करण्यास आणि जशी गरज असेल त्याप्रमाणे भविष्यातील तारखेस पुढील प्रस्तुतीकरण करण्यास अनुमति द्यावी; आणि

viii. योग्य वाटेल तसा आणि खटल्याच्या सत्यता आणि परिस्थितींनुसार रास्त वाटेल असा आदेश द्यावा आणि पुढील आदेशही देण्यात यावे.